# 'वसतिगृह सुरक्षेबाबत अहवाल सादर करा'

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

## महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे आदेश

मरिन ड्राइव्ह येथील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील तरुणीच्या हत्याप्रकरणाची राज्य महिला आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. वसतिगृहाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत सद्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे आदेश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिले. चाकणकर यांनी मरिन ड्राइव्ह पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांसह शिक्षण सहसंचालकांना हा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य महिला आयोगाच्या सदस्य उत्कर्षा रुपवते यांनी या वसतिगृहाला बुधवारी भेट दिली.

मरिन ड्राइव्ह येथील उच्च शिक्षण विभागाच्या सावित्रीबाई फुले वसतिगृहात एका तरुणीचा विवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळल्याची घटना मंगळवारी रात्री उघडकीस आली. या तरुणीवर बलात्कार करून हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत असून सुरक्षा रक्षकाने हे कृत्य केल्याची शक्यता आहे. या सुरक्षा रक्षकानेही मंगळवारी रात्री रेल्वेखाली आत्महत्या केल्याचे समोर आले. सध्या पोलिस या प्रकरणाची सखोल चौकशी करीत असून याप्रकरणी महिला आयोगानेही गंभीर दखल घेतली आहे. चाकणकर यांनी मरिन ड्राइव्ह पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांसह उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालकांना पत्र लिहून यासंदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या पत्रात त्यांनी वसतिगृहाला आणि संबंधित पोलिस ठाण्याला आयोगाच्या सदस्य भेट देणार असल्याचे नमूद केले आहे.

### 'वसतिगृहांचे सुरक्षा ऑडिट करा'

या घटनेने महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. राज्य सरकार आणि संबंधित विभागांनी आता तरी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अतिगांभीर्याने घ्यावा आणि राज्यातील सर्व महिला वसतिगृहांचे सुरक्षा ऑडिट करावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी केली आहे.

### 'सरकार गंभीर नाही'

'मुंबई शहरातील एका वसतिगृहात मुलीवर झालेल्या बलात्काराची घटना वेदनादायी आहे. मुंबईसह राज्यभरातील महिला आणि मुलींच्या सुरक्षेबाबत केंद्र आणि राज्य सरकार गंभीर नसल्याचे यावरून दिसते', असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या खा. सुप्रिया सुळे यांनी केला.

### 'शरमेने मान खाली'

'मुंबईमधील वसतिगृहामध्ये एका मुलीवर झालेला अत्याचाराचा अमानुष प्रकार हा राज्य सरकारला शरमेने मान खाली घालायला लावणारा आहे', अशा शब्दांत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी बुधवारी टीका केली. महिला अत्याचाराच्या घटना राज्यात सातत्याने वाढत आहे. मात्र, सरकार कठोर भूमिका का घेत नाही, असा प्रश्न पवार यांनी विचारला आहे. अशा घटनांना पोलिस, सरकार जबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी केला. वसतिगृहात त्या नराधमाला सुरक्षारक्षक म्हणून कसे नेमण्यात आले, किती जणांनी हे कृत्य केले, याची सखोल चौकशी झाली पाहिजे अशी मागणी पवार यांनी केली.

महाराष्ट्र टाइम्स 8/6/23